


**7.1.11 - Institution celebrates / organizes national and international commemorative days, events and festivals**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. अंतर्गत
## कामधेनू सेवाभावी संस्थेचे,
## वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर ता. अंबाजोगाई, जि. बीड

# रा.से.यो. वार्षिक अहवाल सन २०२२ - २३

दि. १५/०६/२०२२ रोजी मा. प्राचार्य **डॉ. अरूण दळवे** यांच्या अध्यक्षतेखाली रा.से.यो. च्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलविण्यात आली.या बैठकीत खालील विषयावर चर्चा झाली.

१. स्वंयसेवक नोंदणी, रेडरिबन क्लब व आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करणे.
२. स्वंयसेवकांचे उद्‌बोधन व श्रमदान कार्यक्रम राबवणे.
३. थोर पुरूषांच्या जयंतीचे, पुण्यतिथीचे आयोजन करणे.
४. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या व्याख्यानाचे आयोजन करणे.
५. विविध स्तरावरील स्पर्धा, शिबिरातून स्वयंसेवकांना सहभागी करणे.
६. रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करणे.
७. गणवेश वाटप, वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन करणे.
८. रा.से.यो. दिन व रा.से.यो. कार्यप्रसिध्दी सप्ताहाचे आयोजन करणे.
९. रा.से.यो. वार्षिक शिबिराचे आयोजन करणे.
१०. नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कार्यक्रमाचे हिशोब सादर करणे.
११. दि. २१ जुन २०२२ **आंतरराष्ट्रीय योगदिन** महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी योगाचार्य शिवलिंग महाजन यांनी योगाचे प्रशिक्षण दिले. यावेळी प्राचार्य, डॉ.अरुण दळवे व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.
१२. दि. ०१/०७/२०२२ कृषी दिनाचे औचित साधून महाविद्यालय परिसरात वृक्षाची लागवड करण्यात आली.

- दि. १३/०७/२०२२ पासून रा.से.यो. स्वयंसेवकांची नोंदणी करण्यास सुरूवात झाली.
- दि. ०१/०८/२०२२ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. अरूण दळवे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. डॉ.संजय खाडप व प्रा.उदार एन.एस. हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्रा.डॉ. वाघमारे एस.डी.यानी तर सुत्रसंचालन प्रा.डॉ. सवने जी.बी. यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा.जोगदंड सर यांनी मानले.

- दि. ०१ ऑगरट ते १५ ऑगस्ट २०२२रोजी महाविद्यालयाचा परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.
- दि. ०७ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२रोजी महाविद्यालयाचा श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला.
- दि.०९/०८/२०२२ रोजी क्रांतीदिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी वंदे मातरम! भारत माता की जय! अशा घोषणा दिल्या.
- दि.१२/०८/२०२२ व १३/०८/२०१६ रोजी स्वातंत्र्यदिन पूर्व तयारी म्हणून श्रमदान शिबिर घेण्यात आले यावेळी स्वयसेवकांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ केला.
- दि.१३/०८/२०२२ रोजी स्वच्छता रॅली काढण्यात आली, व हर घर तिरंगा मोहिम राबविण्यात आली.
- दि.१४/०८/२०२२ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त रांगोळी स्पर्धा व हर घर तिरंगा मोहिमचे आयोजन.
- दि. १५/०८/२०२२ रोजी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून ध्वजारोहण कार्यक्रमानंतर मान्यवराच्या हस्ते गणवेश वाटप, वृक्षारोपन करण्यात आले.
- दि.२३/०८/२०२२ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य, डॉ.अरुण दळवे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.
- दि. २६/०८/२०२२ रोजी श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला.
- दि. ०१/०९/२०२२ रोजी एड्स विषयी प्रश्न मंजूषा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मोठया संख्येनी विद्यार्थी सहभागी झाले.
- दि.०५/०९/२०२२ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन याच्या जयंतीचे औचित्य साधून शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.अरुण दळवे तर प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.तुडमे व प्रा.गोडबोले सर होते.
- दि.१७/०९/२०२२ रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.
- दि.२३/०९/२०२२ रोजी श्रमदान शिबिर घेण्यात आले.
- दि.२४/०९/२०२२ रा. से. यो. दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अरूण दळवे हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ.लहाडे, प्रा.डॉ.अमोल गंगणे व प्रा.डॉ. वाघमारे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उदार एन.एस. यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.डॉ. सवने जी.बी. व आभार प्रा. दिक्षीत सर यांनी मानले.

◘ दि. ०२ ऑक्टोबर २०२२ रोजी लाल बहादूर शास्त्री व महात्मा गांधी यांची जयंती जागतिक अंहिसा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. अरूण दळवे हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. जोगदंड सर व प्रा.डॉ.मोरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. सवने यांनी केले तर कार्यक्रमाचे संचलन प्रा. दिक्षीत एस.डी. व आभार प्रा.डॉ.कोटुळे बी.एम. यांनी मानले.

◘ दि. ३१/१०/२०२२ सरदार वल्लबभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. अरुण दळवे, प्रा.डॉ. अमोल गंगणे, प्रा. जोगदंड व कर्मचारी उपस्थित होते.

दि. ०६/१२/२०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी डॉ. आंबेडकराच्या प्रतिमेचे पुजन प्राचार्य,.डॉ.दळवे ए.वाय. यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

दि. ०३ जानेवारी २०२३ रोजी सावित्रीबाई फुले यांची जंयती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अरुण दळवे हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. मनिषा देशमुख, डॉ. अल्का देशमुख उपस्थित होते.

दि. १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद याची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव गोविंदराव देशमुख तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा.संतोष मोहिते उपस्थित होते. कॅशलेस व्यवहार कसा करावा या विषयावर मोहिती सरांचे व्याख्यान झाले.

दि. २३ व २४ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयात श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला.

दि. ३१/०१/२०२३ रोजी लोकशाही पंधरवाडा निमित्त डॉ.तुडमे यांनी व्याख्यानातून लोकशाही बाबत जागृत घडवून आणली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.मोरे होते. प्रास्ताविक प्रा.डॉ.अमोल गंगणे यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि. ०९/०२/२०२३ ते १५/०२/२०२३ या कालावधीत रा.से.यो. विशेष वार्षिक शिबीर मौजे चोथेवाडी येथे घेण्यात आले.

दि. १९ फेब्रुवारी २०२३ रोजी छात्रपती शिवाजी महाराज जंयतीचा कार्यक्रम घेण्यात आला. या शिवाय विविध शिबिरे,चर्चासत्रासाठी स्वयंसेवकांना पाठविण्यात आले.

कार्यक्रमाधिकारी
PROGRAMME OFFICER
National Service Scheme
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed


प्राचार्य
PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

# Savitri Bai Phule Jayanti



# Gadage Baba Jayanti






PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed 431519